# राजर्षी शाहू महाविद्यालयातील सायबर वॉरियर्सचा सत्कार

**लातूर : प्रतिनिधी**



येथील राजर्षी शाहू महाविद्यालय व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्तिक करारांतर्गत सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम लातूर तसेच जवळपासच्या जिल्ह्यामध्ये राबविण्यात आला होता. या उपक्रमामध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल क्विक हिल फाऊंडेशनचा राष्ट्रीय स्तराचा स्मार्ट सायबर क्लब हा पुरस्कार महाविद्यालयाला व बेस्ट सेक्रेटरीचा पुरस्कार प्रतीक्षा रमेश पागे या विद्यार्थिनीला महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुणे येथे प्रदान करण्यात आला होता. सत्कार समारंभात उल्लेखनीय कार्य केलेल्या सायबर वॉरियर्सचा सत्कार प्रख्यात प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांच्या हस्ते करण्यात आला. यात सायबर वॉरियर्स म्हणून माहिती तंत्रज्ञान विभागातील बी. सी. ए. व बी. एससी. सी. एस. मधील एकूण ४० विद्यार्थ्यांचा सहभाग होता.